
# लिंगभाव समानता




संपादक

डॉ. संदीप बी. काळे

151

# लिंगभाव समानता

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – 8th March – 2023.

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

**ISBN - 978-93-95494-04-5**

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

152

# Index


| S.No | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | मुलांच्या शैक्षणिक विकासात महिला पालकांची भूमिका<br>डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | 1 |
| 2 | लैंगिक असमानतेची कारणे आणि जागरूकता<br>प्रा. प्रियंका भाऊसाहेब पेंडभाजे | 7 |
| 3 | महिला सबलीकरण<br>डॉ. स्वाती मधुकर वाकोडे | 15 |
| 4 | आदिवासी समुदायातील लिंगभाव समानता<br>प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | 22 |
| 5 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथाविश्वाचा अभ्यास<br>प्रा. डॉ. प्रिती किशोर उमाठे | 30 |
| 6 | लिंगभाव समानता : मानवी हक्क आणि घटनात्मक तरतुदी<br>डॉ. सुखनंदन डाले | 36 |
| 7 | लैंगिक असमानता आणि त्यावरील उपाय<br>प्रा. डॉ. हुरगुळे निवृत्ती रंगनाथ | 44 |
| 8 | महिलांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविणे - एक आव्हान<br>प्रा. डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे | 53 |
| 9 | पंचायतराज व्यवस्थेत स्त्रियांचा सहभाग<br>प्रा. हेमलता आनंदराव उराडे | 58 |
| 10 | स्त्री सक्षमिकरण आणि मानवाधिकार : योजना आणि उपाय<br>डॉ. हर्षना सोनकुसरे | 66 |
| 11 | लिंगभेदभाव आणि तृतीय पंथीयांच्या समस्या<br>डॉ. लता नारायण जाधव | 72 |
| 12 | LGBTQ समुदाय व सामाजिक चळवळीचीवाटचाल<br>विशाल डोळे | 78 |


प्रा. खंदारे के. जे.
लोकप्रशासन विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय हिंगोली

# लैंगिक असमानता आणि त्यावरील उपाय

**प्रा. डॉ. हुरगूळे निवृत्ती रंगनाथ**
समाजशास्त्र विभाग प्रमुख,शिवाजी महाविद्यालय, हिंगोली. ,मो.नं.9881941329

## प्रस्तावना

भारतीय इतिहासाचा आढावा घेतला असता असे दिसून येते की, वैदिक कालखंडात भारतीय स्त्रियांचा दर्जा हा समानतेचा होता. त्यांना विवाहासाठी त्यांच्या इच्छेनुसार वर निवडण्याचा अधिकार होता. त्याचबरोबर घरातील महत्त्वाच्या निर्णयांमध्ये यांचा सहभाग असायचा. महाभारत, रामायण काळात सुद्धा स्त्रियांना विवाह व इतर अधिकार असल्याचे आपणास दिसून येते. याच कालखंडातील घोषा, लोपमुद्रा, सिंकना,निनावरी अशा स्त्रियांनी वेदातील मंत्राची रचना केल्याचा उल्लेख आढळून येतो. तसेच मैत्रीयी,गार्गी,वडवा या स्त्रिया विद्येच्या क्षेत्रात प्रविण असल्याचा उल्लेख सापडतो. सातवाहनाच्या काळात सम्राट सातकर्णी यांची राणी नागनिका ही कर्तबगार स्त्री म्हणून ओळखली जात होती. तिने पतीच्या निधनानंतर सभ्यस्त राहून राज्याचा राज्यकारभार पाहिला. तिने आपल्या आयुष्यात राज्य हेच सर्वस्व मानून एक चांगल्या प्रशासक म्हणून कार्य केले. त्यांचे हे कार्य एखाद्या पुरुषाला लाजवेल असे होते.

वैदिक कालखंडातील स्त्रियांची स्थिती ही हळूहळू बदलत गेली व येथून स्त्रियांच्या ऱ्हासाला सुरुवात झालेली आपणास पहावयास मिळते. ब्रह्मपुराणात कुटुंबाची रचना बदलली. या काळात अर्थार्जण करणारा घटक म्हणून पुरुषाकडे पाहिले जाऊ लागले. यामुळे कुटुंबातील त्यांचे महत्त्व वाढत गेले व या काळापासून मातृसत्ता कुटुंब पद्धतीचा -हास होऊन पुरुषसत्ताक म्हणजे पुरुषप्रधान कुटुंब पद्धतीला सुरुवात झाली. स्त्रियांचा दर्जा हा हळूहळू कमी होत गेला. हा काळ हा धर्मग्रंथाचा काळ म्हणून सुद्धा ओळखला जातो. मनुसारख्या लेखकांनी स्त्रियांच्या विरोधी लिखाण केले. यामुळे स्त्रियांचे स्थान हे गौण होत गेले व याच ठिकाणी स्त्रियांचा दर्जा घसरला. याचाच परिणाम म्हणून स्त्रियांच्या शिक्षणावर बंधने घालण्यात आली व त्यांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादल्या गेले. तिला कुटुंबाचा सेवक

154

बनवल्या गेले. स्त्रीने बालपणात वडिलांच्या आज्ञेत, तरुणपणी पतीच्या आज्ञेवर तर म्हातारपणी मुलांच्या आज्ञवर आपले जीवन जगावे, असे विचार या काळात निर्माण झाले. स्त्रीसाठी 'पती हाच परमेश्वर आहे' असे मानून तिने आपले जीवन जगावे असे समजले गेले.

स्त्रियांच्या जीवनाला एकदम कमी लेखणारा हा काळ मानल्या गेला. या सर्व गोष्टीचे परिणाम म्हणून बालविवाह, जठर कुमारी यासारख्या प्रथा निर्माण झाल्या. पती निधनानंतर तिचे केशवपन केले जाई. स्त्रीला पुनर्विवाह करण्यास मज्जाव करण्यात आला. मनुने स्त्रीला 'सर्व संकटाचे मूळ' म्हणून संबोधले होते. ऐतरेचे ब्राह्मणांनी स्त्रीला 'दुःखाची खाण' तर तुलसीदासांनी स्त्रीला पशु संबोधले. याशिवाय धार्मिक साहित्यातून, कथातून स्त्रीला भावनाप्रधान, नाजूक, हळवी, दुर्बल, चंचल, भुरळ पाडणारी, मोहक, मूर्ख, लोभी, वाचाळ, असत्य बोलणारी अशी वैशिष्ट्यपूर्ण चित्रण केलेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार केला असता असे दिसून येते की स्त्रियांबाबत लिंगभाव विषयक विषमता किंवा असमानता निर्माण केली गेली. यामुळे स्त्रियांचे जीवन हे अशा अनेक समस्यांनी व्यापून गेले होते. खऱ्या अर्थाने त्यांना एक मानव म्हणून मिळणारे अधिकार सुद्धा हिरावून घेतल्याचे दिसून येते.

**भारतातील लैंगिक असमानतेचे प्रकार**

भारत हा पुरुषप्रधान देश असून भारताला स्त्री व पुरुषातील लैंगिक असमानता असून ती असमानता स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची घसरण करण्यासाठी कारणीभूत ठरली आहे. स्त्रियांना त्यांचे मानवी हक्क न मिळता पुरुषप्रधान संस्कृतीमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांची पीछेहाट करण्याचा प्रयत्न केलेला आपणास पहावयास मिळतो. अलीकडील काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारलेला असला, तरी पूर्ण सक्षमीकरण किंवा सबलीकरण झालेले नाही. पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रियांना असमानतेची वागणूक मिळत आहे, ही वागणूक कोणत्या क्षेत्रात आहे हे खालील घटकाच्या आधारावर स्पष्ट होते.

**(1)मर्त्यता व असमानता:-**

भारतीय समाजात मृत्युदराचा विचार केला असता असे दिसून येते की, पुरुष अर्भकाच्या मृत्यूपेक्षा स्त्री अर्भकाचा मृत्यू दर जास्त आहे. याचे परिणाम हे भारतीय

155

लोकसंख्येचे गुणोत्तर बदलण्यात कारणीभूत ठरत आहे. भारतीय समाज स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण हे झपाट्याने वाढत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे जन्म व मृत्यू दराचा परिणाम लोकसंख्येवर होत आहे.

**(2) प्रसूती व असमानता:-**

भारतात सध्या स्त्री भृण हत्याचे प्रमाण हे फार मोठ्या प्रमाणात वाढल्याचे आपणास पहावयास मिळत आहे. गर्भलिंगाची तपासणी करणे हे कायद्याने गुन्हा असला तरी सुद्धा अनेक डॉक्टर हे पैशाच्या लोभापाई गर्भजल परीक्षण करत असल्याचे दिसून येत आहे. या गुन्ह्याखाली महाराष्ट्रातील परळी व नांदेड येथील काही डॉक्टरवर गुन्हा सिद्ध झाला आहे. या सर्व गोष्टीला भारतीय पुरुष प्रधान संस्कृती वंशाला दिवा, हुंडा पद्धती हे काही प्रमुख कारणे समोर आली आहेत. यामुळे अनेक व्यक्ती हे महाराष्ट्राबाहेर जाऊन गर्भजल परीक्षण करत असलेले दिसून येत आहे. यामधून स्त्रीभ्रूणहत्या घडवून येत आहेत. त्याबाबतची बातमी व वर्तमानपत्रातून पहावयास मिळते.

**(3) मूलभूत सुविधेतील असमानता:-**

जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मग तो स्त्री असो वा पुरुष त्यांच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा शारीरिक मानसिक एकंदरीत व्यक्तिमत्व विकास होत नाही. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे भारतात तशा स्त्रियांना सुविधा दिल्या जात नाहीत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झाल्याचे आपणास पहावयास मिळत नाही.

**(4) व्यावसायिक व घरगुती असमानता:-**

व्यवसाय व घर हे मानवी जीवनात अत्यंत महत्त्वाच्या बाबी समजल्या जातात. पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या या व्यवस्थेत अर्थार्जनाची जबाबदारी ही पुरुषाची असते. असा समाज मनाचा कयास असल्यामुळे स्त्रियांनी स्वतंत्ररित्या कोणतेही व्यवसाय करू नये असे पुरुषाचे मत आहे. त्याचबरोबर त्यांनी फक्त घरगुती कामे करावी व व्यवसायात मदत करावी ही अपेक्षा आहे. अर्थतज्ञांनी घरगुती कामांना अर्थाजनाचा दर्जा न दिल्याने त्याचे कार्य हे कुचकामी समजले जाते.

156

घरातील कामात समानता असाव्यात हवी, पण ती नसते म्हणून लैंगिक असमानता वाढीस लागते.

**भारतातील लैंगिक असमानतेचे स्वरूप:-**

**(1) लिंग भेदभाव:-**

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री जन्माचा विरोध असतो हाच मुळात भेदभाव आहे, असे आपणास म्हणता येते. मुलीचा जन्म हा शाप समजण्यात येतो. त्यामुळे स्त्रियांचे अवमूल्यन होत असलेले पहावयास मिळते. भारतीय समाजात लिंग भेदाचे हे स्वरूप हे कठोर आहे. मोक्ष प्राप्ती व वंशाचा दिवा म्हणून मुलाचा जन्म अत्यंत महत्त्वाचा समजण्यात येतो. मुलगा हा म्हातारपणाला आधार आहे तर मुलगी ही परक्याचे धन समजण्यात येते. त्यामुळे मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करण्यात येतो. यामधून लिंग असमानता निर्माण होत असल्याचे दिसून येते.

**(2) रोजगार:-**

भारतीय समाज कृषी प्रधान समाज म्हणून ओळखला जातो. आजही जवळपास 70% लोक हे ग्रामीण भागात वास्तव्य करत आहेत. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. शेतीतील कार्यासाठी स्त्री व पुरुष दोघांची आवश्यकता असते. या ठिकाणी पुरुषाला जास्त रोजगार व स्त्रियांना कमी रोजगार दिला जातो. हा विरोधाभास आपणास पहावयास मिळतो. काही प्रमाणात गृह उद्योग आहेत, पण त्या ठिकाणी रोजगारांची सुरक्षा पहावयास मिळत नाही.

**(3) आरोग्य सुविधा:-**

पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना आरोग्याचे प्रश्न जास्त प्रमाणात भेडसावतात. कारण निसर्गाचा मातृत्व स्त्रियावर लादल्यामुळे स्त्रियांना अनेक रोगांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे कुटुंबाने व शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे, परंतु वास्तव वेगळे आहे. स्त्रियांच्या आजाराकडे कुटुंबातील व्यक्ती जास्त लक्ष देत नाहीत. स्त्रिया सुद्धा आपल्या आरोग्याच्या बाबत तेवढ्या जागरूक नाहीत, हे आपणास पहावयास मिळते. भारतासारख्या देशाचा विचार केला असता असे दिसून येते, की स्त्री अर्भकाचे कुपोषणाचे प्रमाण हे जास्त आहे. त्यातल्या त्यात आदिवासी व ग्रामीण भागात हे प्रमाण जास्त प्रमाणात पहावयास मिळते.

157

आदिवासी व ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य हे कमालीचे निकृष्ट दर्जाचे पहावयास मिळते. आजारी असताना त्यांना दवाखान्यात नेल्या जात नाही, यातून असमानता निर्माण होत आहे असे दिसते.

**(4) यौन शोषण व इजा:**

अनादी काळापासून स्त्री ही पुरुषाच्या शोषणाची बळी पडली आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय स्त्रियांना यौन शोषण व शारीरिक, मानसिक इजा अशा समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वेश्यावृत्ती, देवदासी, अशील साहित्य, जाहिराती, चलचित्र, नृत्य यामुळे स्त्रियांचे शारीरिक शोषण फार मोठ्या प्रमाणात होत असलेले पहावयास मिळते. याशिवाय छेडछाडीमुळे सुद्धा शारीरिक व मानसिक इजा पोहोचते. वरील सर्व गोष्टीचा विचार केला असता, स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे असे समजण्यात येते.

**(5) हुंडा:-**

हुंडा म्हणजे वधू पित्याने किंवा वर पित्याने दिलेली वस्तू व पैशाच्या स्वरूपातील भेट होय.भारतीय समाजात हुंडा देणे व घेणे हे कायद्याने गुन्हा आहे. तरीसुद्धा तो समाजमान्य आहे व जे समाजमान्य असते ते सार्वत्रिक असते, त्यामुळे भारतात अनेक जाती समूहातून हुंडा घेतला व दिला जातो. या हुंड्यामधूनही स्त्रियांची मोठी मानहानी होत आहे. हुंड्यासाठी सासरच्या मंडळी कडून त्रास दिला जातो. याबाबत दररोजच्या वर्तमानपत्रात आपल्याला बातम्या वाचावयास मिळतात.हुंड्यासाठी अनेक नववधूला जिवंत जाळण्याची उदाहरणे पाहावयास मिळतात. घटस्फोटामुळे मुलांचा प्रश्न, उदरनिर्वाहाचा प्रश्न, सामाजिक अप्रतिष्ठा, बाल गुन्हेगारी असे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात.

**(6) हिंसा व स्त्रीभ्रूणहत्या :-**

भारतीय समाज व स्त्रियांना मिळणारा सामाजिक व कौटुंबिक दर्जा हा दुय्यम राहिलेला आहे. पितृसत्ताक कुटुंब पद्धती असल्यामुळे कधी हुंड्यासाठी तर कधी जाणून बुजून स्त्रीला अपमानित केले जाते. अनेकदा स्त्रियांना घरात मारपिट केली जाते. स्त्रीच्या हातून काही गुन्हा घडल्यास स्त्रियांना व माणूस त्रास (छळ) दिला जातो. एवढेच नव्हे तर छेडछाड, बलात्कार अशा घटना घडतात. त्यामुळे स्त्री

158

हिंसा घडते व लैंगिक असमानता निर्माण होते. हल्ली स्त्रीभ्रूण हत्या करणाऱ्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. स्त्रीच्या पोटातच स्त्री अर्भकाचा खून केला जात आहे. एका बाजूला लोकांना आजी, आई, बहिण, पत्नी पाहिजे पण मुलगी नको असा विचार समाज मनात रुजला आहे, हे चित्र संबंध भारतभर दिसून येत आहे.

**लैंगिक असमानता कमी करण्याचे उपाय:-**

भारतीय समाजात स्त्रियांच्या बाबतीत व समानता दिसून येते. पदोपदी स्त्रियांना असमानतेला सामोरे जावे लागते. त्यांना असमानतेची वागणूक दिली जाते. यामुळे स्त्रियांच्या अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. शहरी, ग्रामीण, आदिवासी स्त्रियांचे प्रश्न वेगवेगळया स्वरूपाचे आहेत. स्त्री उद्धारासाठी यापूर्वी अनेकांनी काम केलेले आहे. त्यासाठी समाजसुधारक, राज्यघटना, शासन यांची भूमिका महत्त्वाची राहिलेली आहे. परंतु आजही हे प्रश्न सुटलेले नाहीत, यासाठी सर्वांनी समोर येऊन कार्य करणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत स्त्री जीवनाचा विकास झाल्याबाबत चर्चा होत असला, तरी तळागाळातील स्त्रियांना आजही असह्य जीवन जगावे लागते. कोणताच अधिकार नसलेली व इतरांच्या उपभोगाची वस्तू बनलेली स्त्री एक जिवंत पशुप्रमाणे जीवन जगते. ही बाब मानवतेच्या व समाज विकासाच्या दृष्टीने निश्चित चांगली नाही. त्यामुळे स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

(1) भारतीय समाज सुधारणेला खऱ्या अर्थाने सुरुवात ही राजाराम मोहन राय यांच्या कार्यापासून झाली आहे असे म्हणता येते. त्यांनी सतीच्या चालीविरोधात निर्माण केलेल्या जनमतामुळे लॉर्ड बेंटिंग यांनी सन 1829 साली सतीबंदीचा कायदा केला. तसेच त्याच काळात सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री उद्धारासाठी सन 1847 मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या मुला-मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादी देखील स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला होता. आगरकर यांनी मुलींना मुलाबरोबर शिक्षण द्यावे अशी पुरोगामी भूमिका मांडली. तसेच बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, महर्षी

159

धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री सशक्तिकरणाचे विचार मांडले. त्यांनी स्वतः विधवा स्त्री सोबत विवाह केला व विधवा विवाहास चालना दिली.

(2) पूर्वी बालविवाहाचे प्रमाण हे जास्त होते त्यामुळे 1929 ला प्रतिबंधक कायदा निर्माण करण्यात आला. यामुळे बालविवाहाला काही प्रमाणात प्रतिबंध लागला. 1955 साली दोन विवाह करण्यावर बंदी घालण्यात आली. 1956 साली हिंदू वारसा कायदा पास करून हिंदु आईला व मुलाला संपत्तीत समान हिस्सा देण्यात आला.

(3) भारतीय राज्यघटनेच्या कलम 15 नुसार धर्म, जात, जन्म व लिंग या आधारावर भेदभाव करता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. यात डॉक्टर आंबेडकरांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. भारतात कौटुंबिक प्रश्न वाढत होते त्यासाठी स्वतंत्र न्याय व्यवस्था नव्हती. सन 1984 साली कौटुंबिक न्यायालयाचा कायदा पास करून त्यात पोटगी, संपत्तीचा वाद, अपत्याचा ताबा, घटस्फोट याबाबत लवकर निर्णय घ्यावयाचे ठरले.

(4) 1989 साली पॅरिस येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत स्त्री-पुरुषांना समान कामाचा समान मोबदला मिळाला पाहिजे अशी मागणी करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून शासकीय सेवेत काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना समान वेतन मिळते. 1908 मध्ये भरलेल्या न्यूयॉर्क येथील महिला परिषदेत महिलांना मतदानाचा अधिकार मागण्यात आला. त्यामुळे, 1935 साली भारतात स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. 1954 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्त्रियांच्या हक्काची सनद मंजूर केली.

(5) स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणजे 8 मार्च 1992 रोजी झालेल्या महिला आयोगाची स्थापना होय. या महिला आयोगाच्या कार्यकक्षेत सर्व प्रकारच्या समस्या येतात. त्यामुळे महिला आयोग एक महिलांसाठीचे न्यायालय आहे. सन 1995 मध्ये महिलांसाठी चौथी जागतिक महिला परिषद बिजिंग येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत 'मानवी हक्क तेच महिलांचे हक्क' हे घोषवाक्य

160

देण्यात आले. भारत सरकारने या घोषवाक्यप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली. त्यानंतर 2004 हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्षाने साजरे करण्यात आले.

(6) सन 2001 मध्ये शिक्षणाच्या हक्काचा कायदा पास करण्यात आला. त्यात मुली व मुलांना शिक्षण घेण्याचा हक्क राहील अशी नमूद करण्यात आले. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासन करत आहे. स्त्री शिक्षणाचा हक्क देऊन चालणार नाही, तर प्रत्यक्षात स्त्री शिक्षण होते का? दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबातील, दलित कुटुंबातील मुली खरोखरच शिक्षण घेतात का? त्याचे प्रमाण किती आहे? याचा शोध लावणारी यंत्रणा शासनाने उभी केली पाहिजे.

(7) स्त्रियांना सर्वच क्षेत्रात 50 टक्के आरक्षणाची तरतूद केली पाहिजे. जर एक हजार पुरुषामागे किमान एक हजार स्त्रियांची आवश्यकता असेल तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्वच हक्क मिळाली पाहिजे. उच्च शिक्षणात ग्रामीण व आदिवासी स्त्रियांचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी सर्व जाती धर्माच्या मुलींना छात्र शिष्यवृत्ती देऊन संशोधनासाठी त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजे.

(8) स्त्रीवर मातृत्व लादू नये तो तिचा नैसर्गिक अधिकार असल्यामुळे त्यास संवैधानिक रूप द्यावे. जेणेकरून ग्रामीण व आदिवासी स्त्रियांवरील अन्याय व तणाव कमी होऊन त्याची मते लक्षात घेतले जातील.

(9) स्त्री पुरुष समानता आयोगाची स्थापना करावी. त्या मार्फत स्त्री व पुरुषाचे समाजातील प्रमाण समान राहण्यासाठी प्रयत्न करावे. देशातील सर्व राज्यात या आयोगाची स्थापना करून त्यावर केंद्रात केंद्रीय आयोग असावा. देशभरात होणारे सर्व जन्म व मृत्यू याबाबतची सर्व प्रक्रिया या आयोगाच्या नियंत्रणात द्यावी. तसेच या आयोगातील 80% कर्मचारी वर्ग महिला असावा. स्त्रियांनी त्यांचे स्थानिक संघटन वाढवून त्याची व्याप्ती राज्य व केंद्रस्तरावर मजबूत करावी.

वर उल्लेख केल्याप्रमाणे यापूर्वीसुद्धा स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी वेगवेगळ्या कायद्याची निर्मिती करण्यात आली आहे व काही आयोग सुद्धा कार्यरत आहेत. त्यात वरील काही उपायाप्रमाणे प्रत्यक्ष कार्य झाले आणि स्त्रियांनी सुद्धा त्यासाठी स्वतः प्रयत्न केले तर निश्चितच स्त्री जीवन हे सुखमय

161

झाल्याशिवाय राहणार नाही. या माध्यमातून स्त्री पुरुष समानता निर्माण करता येईल.

**संदर्भ:-**

(1)देहाडराव, स्वाती व अनघा तांबे (2009), भारतातील स्त्रियांचे सामाजिक पक्षमीकरण, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री अभ्यास केंद्र, सा. फुले पुणे विद्यापीठ पुणे.

(2)सुमंत, यशवंत (1999), स्त्रीमुक्तीची पहाट, मिळून सा्याजणी, मासिक, पुणे, फेब्रुवारी.

(3)सोनवणे, विलास (2013), 'प्रश्न स्त्री शिक्षणाचा आणि बहुजन स्त्रीवादाचा' सगुना मासिक, पुणे.

(4)विद्युत, भागवत (2004), 'स्त्री प्रश्नांची वाटचाल' प्रतिभा प्रकाशन, पुणे.

PRINCIPAL
College, HINGOLI

162